| MHNS190016952022 | फौजदारी चौकशी अर्ज क्र. ३६४/२०२२.<br>वैष्णवी सुरेश माळी.<br>विरुध्द<br>सुरेश भिमराव माळी. |
|---|---|

निशाणी ५ वरील आदेश
दिनांक ३१.०७.२०२३.

**१**. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२**. अर्जदाराने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, तिचे व गैरअर्जदाराचे लग्न दिनांक १८.०१.२०२१ रोजी झाले आहे व आजही त्यांचे नाते कायम आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराकडे राहायली गेली. दोन महिणे त्याने तिला व्यवस्थित नांदविले त्यानंतर त्याने तिला त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर तुला स्वयंपाक येत नाही असे म्हणुन गैरअर्जदार तिला त्रास देवु लागला. तो तिला उपाशीपोटी ठेवु लागला तसेच लग्नात मानपान दिला नाही म्हणुन त्रास देवु लागला.

**३**. गैरअर्जदार दारु पिवुन अर्जदाराला मारहाण करत होता. तिच्या चारित्रावर संशय घेत होता. नोव्हेंबर —२०२१ मध्ये गैरअर्जदाराने अर्जदाराला घरातुन हाकलुन दिले. तेव्हपासून ती माहेरी राहत आहे. अर्जदाराने नांदायला जाण्यासाठी बरेच प्रयत्न केले. दिनांक १६.०१.२०२२ रोजी गैरअर्जदार हा अर्जदाराच्या माहेरी आला व त्याने अर्जदाराच्या आईवडीलांना शिवीगाळ केली व विटभट्टीसाठी रुपये पाच लाख मागितले. त्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदाराविरुध्द येवला शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखली केली तसेच दिनांक २३.०२.२०२२ रोजी अर्जदार हिने मालेगाव येथील महिला शिकायत केंद्र येथे तक्रार केली. त्यानंतर दिनांक ०३.०६.२०२२ रोजी अर्जदाराने पुन्हा पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

**४**. गैरअर्जदाराने अर्जदाराचा स्वत:हुन त्याग केला. अर्जदार ही वडीलांकडे आश्रीताचे जिवन जगत आहे. याउलट, गैरअर्जदार हा विटभट्टीचा व्यवसाय करतो. त्याच्याकडे दहा ते बारा मजुर काम करतात. त्याला दोन ते तीन लाख रुपये

उत्पन्न मिळते. त्याच्याकडे ६ ट्रॅक्टर आहेत. गोविंदनगर येथे गावी त्याचे स्वत:चे सहा खोल्यांचे घर आहे. याउलट, अर्जदाराला उत्पन्नाचे साधन नाही. तिची माहेरची परिस्थिती गरीबीची आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या मुळ अर्जाचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. तोपावेतो तिचे हाल होणार नाही. म्हणुन अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**५.** गैरअर्जदार याने नि.क्र.१५ वर स्वत:चे म्हणणे दाखल केले आहे व अर्जदाराच्या अर्जातील त्याच्याविरोधातील कथने नाकारली आहेत. त्याने त्याच्या म्हणण्यामध्ये त्याने अर्जदाराचा छळ केल्याचे, पाच लाख रुपये मागितल्याचे, तिला मारहाण केल्याचे व दमदाटी केल्याचे नाकारले आहे. तसेच त्याने दारु पिवुन शिवीगाळ केल्याचे नाकारले आहे.

**६.** गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १८. ०१.२०२१ रोजी त्याचे व अर्जदाराचे साध्या पध्दतीने लग्न झाले. सदर लग्नात त्याने अर्जदाराच्या वडीलांना लग्नाचा खर्च म्हणुन रुपये वीस हजार दिले. अर्जदार लग्नानंतर एक महिणा व्यवस्थित नांदली. त्यानंतर तिने वेगळी राहण्याची मागणी केली. गैरअर्जदाराचे आईवडील वयस्कर असल्याने तो वेगळे राहु शकत नव्हता. अर्जदार ही त्याच्या आईवडीलांना अपमानास्पद वागणुक देत होती. ती भांडण करुन घरातील वातावरण अशांत करत होती. अर्जदाराच्या आईचा संसारात जास्त हस्तक्षेप आहे. ती अर्जदाराला फोन करुन उलटसुलट सांगत होती. अर्जदाराची आई अर्जदाराला वारंवार माहेरी नेत होती.

**७.** गैरअर्जदार हा विनंती करुन तिला परत आणत होता. गैरअर्जदार मोलमजुरी करतो. जानेवारी—२०२२ मध्ये अर्जदाराने गैरअर्जदाराबरोबर भांडण केले व तिच्या आईला तसेच भावाला बोलावुन घेतले व त्यानंतर ती त्यांच्यासोबत माहेरी गेली. गैरअर्जदाराने तिला आणण्याचा प्रयत्न केला. परंतु तिने येण्यास नकार दिला. दिनांक २५.०२.२०२२ रोजी गैरअर्जदाराने अर्जदाराला नोटीस पाठवुन नांदायला येण्यास सांगितले. सदर नोटीस मिळुनही अर्जदार नांदायला आली नाही. अशाप्रकारे अर्जदाराने गैरअर्जदाराचा त्याग केला आहे व ती स्वत:हुन माहेरी राहत

आहे.

८. गैरअर्जदाराने हिंदु विवाह कायदा कलम ९ नुसार कोपरगाव येथील कोर्टात अर्ज दाखल केला. म्हणुन अर्जदाराने सदरचा खोटा अर्ज त्याच्यावर दाखल केला आहे. तसेच भारतीय दंड विधान कलम ४९८—अ नुसार खोटी केस केली. गैरअर्जदार हा अर्जदारासोबत संसार करण्यास तयार आहे.

९. गैरअर्जदाराचा विटभट्टीचा व्यवसाय नाही. त्याच्याकडे मजुर नाही, ट्रॅक्टर नाही. तो मोलमजुरीचे काम करतो. त्याच्यावर आईवडीलांची जबाबदारी आहे. याउलट, अर्जदार ही माहेरी शिवणकाम करुन रोज २००/— कमविते. तो अर्जदाराला सांभाळण्यास तयार आहे. अशाप्रकारे गैरअर्जदाराने अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

१०. नि.क्र.०७ व १७ वर अर्जदाराने स्वत:चे उत्पन्नाचे शपथपत्र दाखल केले आहे.

११. अर्जदाराच्या अर्जातील कथने व गैरअर्जदाराच्या म्हणण्यातील कथने यावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी पुढे नमुद कारणमिमांसेसह देत आहे:—

| अ.क्र. | मुद्दे. | निष्कर्ष. |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदाराकडुन दरमहा रुपये ५०००/— अंतरिम पोटगी मिळण्यास अर्जदार ही पात्र आहे काय? | दरमहा रुपये १५००/—. |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा.

१२. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न दिनांक १८.०१.२०२१ रोजी झाले. गैरअर्जदाराने नि.क्र.१५ वर त्याचे म्हणणे दाखल केले आहे. त्याने म्हणण्यामध्ये अर्जदारासोबत लग्न झाल्याचे मान्य केले आहे.

१३. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केल आहे की, गैरअर्जदाराने तिचा

शारीरिक व मानसिक छळ करुन तसेच तिला शिवीगाळ करुन दिनांक २४.०३.२०२२ रोजी घरातुन हाकलुन दिले. अर्जदाराने तिच्या अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ स्वत:चे शपथपत्र नि.क्र.०६ वर दाखल केले आहे. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार ही स्वत:हुन गैरअर्जदाराचा त्याग करुन माहेरी निघुन गेली आहे. यावरुन अर्जदार ही माहेरी राहत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

**१४**. अर्जदाराने नि.क्र.०७ व १७ वर स्वत:चे उत्पन्नाचे शपथपत्र दाखल केले ओह. मी सदर शपथपत्रांचे अवलोकन केले. सदर शपथपत्रांमध्ये अर्जदाराला उत्पन्नाचे साधन असल्याचे नमुद नाही.

**१५**. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, तिला उत्पन्नाचे साधन नाही. तसेच ती आईवडीलांकडे आश्रीत म्हणुन राहत आहे. याउलट, गैरअर्जदाराचा विटभट्टीचा व्यवसाय आहे. त्यापासून त्याला दरमहा दोन ते तीन लाख उत्पन्न मिळते. तसेच त्याचे स्वत:च्या मालकीचे घर आहे. अर्जदाराने तिच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये तो विटभट्टीचा व्यवसाय करत असल्याचे तसेच त्यापासून त्याला दोन ते तीन लाख रुपये उत्पन्न मिळत असल्याचे नाकारले आहे. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार ही माहेरी शिवणकाम करुन दररोज २००/— रुपये कमविते. परंतु त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा गैरअर्जदाराने अभिलेखावर दिलेला नाही.

**१६**. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदाराशी असलेले नाते नाकारलेले नाही. यावरुन अर्जदार व गैरअर्जदार यामधील पती—पत्नीचे नाते अद्याप कायम असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. अर्जदार पत्नीचा सांभाळ करणे हे गैरअर्जदाराचे प्राथमिक कर्तव्य आहे. अर्जदार ही माहेरी राहत असुन तिला उत्पन्नाचे साधन नाही. अशा परिस्थितीत तिला तिच्या मुलभुत गरजा भागविण्यासाठी पैशांची आवश्यकता असल्याचे दिसुन येते, असे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे अर्जदार पत्नीचा सांभाळ करण्याची व तिच्या मुलभुत गरजा भागविण्याची प्राथमिक जबाबदारी

गैरअर्जदाराची आहे. त्यामुळे गैरअर्जदाराकडुन अंतरिम पोटगी मिळणेस अर्जदार ही पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u>**ः—

**१७.** मी मुद्दा क्र.१ करीता नोंदविलेले निष्कर्ष व दिलेले कारणमिमांसा याआधारे पुढील आदेश पारीत करतोः—

**<u>आदेशः</u>**—

**१.** नि.क्र.०५ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** गैरअर्जदाराने अर्जदार यांना अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये १५००/— अंतरिम पोटगी म्हणुन मुळ अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत द्यावेत.

आदेश खुल्या न्यायालयात टंकलिखीत व जाहिर करण्यात आला.

**स्थळः— येवला.**
**दिनांकः— ३१.०७.२०२३.**

**(एम. एस. लिगाडे)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,**
**येवला, जि. नाशिक.**

<u>**प्रमाणपत्र**</u>

मी असे प्रमाणित करतो की, या न्यायनिर्णय/आदेशामधील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव: — | प्रशांत अर्जुन बारगल, निम्नश्रेणी लघुलेखक. |
| न्यायालयाचे नाव :— | श्री. एम. एस. लिगाडे, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,येवला, जि.नाशिक. |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीख:— | ३१.०७.२०२३. |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली केलेली न्यायनिर्णय/आदेशाची तारीख. | ३१.०७.२०२३. |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची | ३१.०७.२०२३. |